**प्रेसनोट** **दि.०९/०३/२०१९**

## सिंहगडरोड पो.ठाणे

## महिला दिनानिमीत्त सिंहगडरोड पोलीस स्टेशन अंकीत नहे पोलीस चौकी हद्दीत महिलांना गुलाब पुष्पाचे वाटप करुन मार्गदर्शन

दि. ०८/०३/२०१९ रोजी महिला दिनानिमीत्त सिंहगडरोड पोलीस ठाण्याचे नहे पोलीस चौकीचे सहा.पोलीस निरीक्षक एस.डी.पाटील, महिला पोलीस उप-निरीक्षक आर.जे.पाटील, मपोशि ९५५९ डी.आर.होळकर, मपोशि ९२७२ व्ही.एस.आखाडे यांनी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधुन नहे गावातील नहे ग्रामपंचायत मधील ०७ महिला सफाई कामगार, काशीबाई नवले हॉस्पीटल मधील १७ महिला सफाई कामगार व १५ परिचारीका महिला यांना बोलावुन घेवुन त्यांना जागतिक महिला दिनाचे महत्त्व सांगुन सदर महिलांना महिलांच्या हक्काबाबत व सुरक्षिततेबाबतची जाणीव करुन देवुन त्यांना कम्युनिटी पोलीसींगचे अनुषंगाने महिला, मुली यांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन लैगींक अत्याचाराबाबतचे गुन्हे, छेडछाडी संदर्भात, ऑनलाईन फ्रॉड, तसेच महिला व मुलींना छेडछाड, संदर्भात काही अडचण आल्यास १०० नंबर वर कॉल केल्यास ५ ते १० मिनीटात दामिणी पथक, बिट मार्शल हे उपलब्ध होतात याबाबत मार्गदर्शन केले. तसेच महिला दिनानिमीत्त सदर महिलांना गुलाब पुष्पांचे वाटप करुन त्यांना महिला दिनाच्या शुभेच्या देण्यात आल्या. सदर वेळी महिलांसाठी चहा व नाष्टयाची उत्तम सोय महिला पोलीस उप-निरीक्षक आर.जे.पाटील यांनी केली होती.

